दिन विशेष...

१३७८ : विजयनगरचे साम्राज्य ज्यांनी स्थापन केले ते संस्थापक बुक्कराय यांचे निधन झाले.

१८६९ : विद्युतभारित कणांवर संशोधन करणाऱ्या चार्लस विल्सन या शास्त्रज्ञाचा जन्म झाला.

१९१६ : मराठी कवयित्री संजीवनी मराठे यांचा स्मृतिदिन.

१९८१ : भारतातील पहिले होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजची स्थापना.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८२,६२६.७६ -१,०४८.१६ (१.२५%)
डॉलर ₹ ९०.६२

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १५ |
| दिल्ली | २६ | १२ |
| मुंबई | ३५ | २१ |
| नागपूर | ३३ | १८ |
| पुणे | ३४ | १२ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९६ किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

जीवनातील प्रत्येक तुफान हे आपल्याला अधिक मजबूत बनवण्याची संधी आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५९ संध्या-६:२५

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५७,४१०/- २,८०,०००/-

### केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर

## रवींद्र चव्हाणांनी पक्षाच्या उमेदवारांविरोधात रसद पुरवल्याचा आरोप

वृत्तसंस्था । सिंधुदुर्ग

**राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळालं. कोकणातही राणेंच्या नेतृत्वात भाजपने विजय खेचून आणला. मात्र, सिंधुदुर्ग जिल्ह्यात अपक्षांच्या विजयाने सर्वांचंच लक्ष वेधून घेतलं असून यातून भाजपमधील अंतर्गत वादही उफाळून आला आहे.**

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे महायुतीत मिठाचा खडा टाकत असल्याचा हल्लाबोल नगरपरिषद आणि नगरपालिका निवडणुकांवेळी शिवसेनेचे आमदार नीलेश राणे यांनी केला होता. त्यानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतही रवींद्र चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. रवींद्र चव्हाण यांनी मेहुणे विनोद राऊळ यांच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपच्या उमेदवारांविरोधातच अपक्षांना बळ देत निवडून आणल्याचा आरोप भाजपमधील एका गटाकडून केला





जाऊ लागला आहे.

तळकोकणात दोन महिन्यांपूर्वी झालेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत भाजपचा बोलबाला राहिला होता.

सावंतवाडी तालुक्यात जिल्हा परिषद गटात काही अपक्ष निवडून आल्याने मंत्री नितेश राणे यांनी जाहीर नाराजी व्यक्त करत खडेबोल सुनावले. या अपक्षांच्या विजयामागे अदृश्य शक्तीचा हात असून छातीवर कमळ लावून काही नेते कमळ चिन्हाच्याच उमेदवारांना पाडण्यासाठी ताकद लावतात, अशा शब्दांत मंत्री नितेश राणे यांनी निकालाच्या दिवशीच आपली नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता राणेसमर्थक उमेदवारांनीही थेट नाव घेत आरोप केले आहेत.

या निवडणुकीत भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेश सारंग यांचा पराभव करून सावंतवाडी तालुक्यात कोलगाव जिल्हा परिषद गटातून मायकेल डिसूजा हे अपक्ष म्हणून निवडून आले. या विजयाचे श्रेय आमचे मार्गदर्शक रवींद्र चव्हाण यांना देणार, अशी प्रतिक्रिया मायकेल डिसूझा यांनी विजयानंतर दिल्याने आश्चर्य व्यक्त झाले. इतकंच नाही तर रवींद्र चव्हाण यांचे मेहुणे विनोद राऊळ यांनी विजयाच्या घोषणा दिल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. तर मायकेल डिसूझा यांच्या विजयानंतरच्या बॅनरवर रवींद्र चव्हाण यांचे फोटो झळकल्याने उलट सुलट राजकीय चर्चा रंगली होती. मात्र हे बॅनर आता काढण्यात आले आहेत. हे बॅनर आपण नाही तर आपल्या कार्यकर्त्यांनी लावले होते, असं स्पष्टीकरण मायकल डिसूझा यांनी दिलं आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात सध्या अपक्ष उमेदवारांना अदृश्य शक्तीच्या हातांनी पुरवलेली रसद, याची चर्चा रंगली आहे.

**➤ राणेंच्या नेतृत्वाखाली महायुतीला विजय मिळाला. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही भाजपचे खासदार नारायण राणे, मंत्री नितेश राणे व आमदार नीलेश राणे यांचा करिष्मा पाहायला मिळाला. पण या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात अपक्ष उमेदवार निवडून आल्याने राणेंच्या वर्चस्वाला काही प्रमाणात धक्का बसल्याची चर्चा सुरु आहे.**

# बीडच्या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी ११ वसतिगृहे

## ● १५९.३६ कोटींच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची माहिती

वृत्तसंस्था । बीड

**जिल्ह्यात स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी ११ सरकारी वसतिगृहे बांधण्यासाठी १५९.३६ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहीती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली आहे.**



बीडच्या पालकमंत्री असलेल्या सुनेत्रा पवार यांनी सांगितले की, स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुलांमध्ये शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि त्यांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय त्यांचा अभ्यास सुरू ठेवण्यास मदत करणे, या उद्देशाने संत भगवान बाबा सरकारी वसतिगृह योजनेंतर्गत ही वसतिगृहे बांधली जाणार आहेत. मान्यताप्राप्त वसतिगृहांमध्ये पाटोदा, केज, परळी, गेवराई आणि माजलगाव येथे प्रत्येकी दोन (मुलांसाठी एक आणि मुलींसाठी एक) आणि बीड येथे एक मुलींचे वसतिगृह समाविष्ट आहे. या योजनेंतर्गत, ऊसतोड कामगारांची संख्या जास्त असलेल्या ४१ तालुक्यांमध्ये मुलांसाठी आणि मुलींसाठी प्रत्येकी ४१ अशी ८२ सरकारी वसतिगृहे उभारण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. प्रत्येक वसतिगृहाची क्षमता १०० विद्यार्थ्यांची असणार आहे. पहिल्या टप्प्यात २० वसतिगृहे (मुलांसाठी १० आणि मुलींसाठी १०) मंजूर करण्यात आली. आता उर्वरित ६२ वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाने जारी केलेल्या सरकारी ठरावाद्वारे एकट्या बीड जिल्ह्यात २२ वसतिगृहे मंजूर करण्यात आली आहेत. सुनेत्रा पवार म्हणाल्या, ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षण मिळावे आणि ते मुख्य प्रवाहात सामील व्हावे हे दिवंगत अजित पवार यांचे स्वप्न होते. पालकमंत्री असताना त्यांनी वसतिगृहांच्या बांधकामाच्या प्रस्तावावर सातत्याने पाठपुरावा केला होता. अनेक ठिकाणी जमीन निश्चित करण्यात आली होती.

**मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी सारथी संस्थेने बांधलेल्या वसतिगृहांच्या धर्तीवर या वसतिगृहांचे दर्जेदार बांधकाम सुनिश्चित करण्याचे आदेश अजित पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते. सध्या तीन ठिकाणी सरकारी जमीन उपलब्ध आहे आणि तेथे बांधकाम सुरू आहे. उर्वरित १९ वसतिगृहांपैकी ११ वसतिगृहांसाठी जमीन उपलब्ध आहे आणि त्यांच्या बांधकामासाठी आता प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, असे पवार म्हणाल्या.**

### थोडक्यात

#### गुंतवणूकदारांचे ७.४० लाख कोटी बुडाले

**मुंबई ।** भारतीय शेअर बाजारात आजचा दिवस घसरणीचा ठरला. आयटी कंपन्यांच्या शेअरची विक्री, जागतिक दबावामुळं भारतीय शेअर बाजारात आज भूकंप झाला. ट्रेडिंग दरम्यान सेन्सेक्स ११०० अंकांनी कोसळला तर निफ्टीमध्ये देखील ३५० अंकांची घसरण झाली. या घसरणीमुळं गुंतवणूकदारांचे ७.४० लाख कोटी बुडाले. सेन्सेक्स शुक्रवारी (दि.१३) रोजी १.२५ टक्क्यांनी म्हणजेच ११४० अंकांनी घसरल्याचं पाहायला मिळालं.. गुरुवारी सेन्सेक्स ८३६७४.९२ अंकांवर बंद झाला होता, त्या तुलनेत आज सेन्सेक्स ८२५३४.५५ अंकांपर्यंत खाली आला होता. अखेर बाजार बंद झाला तेव्हा सेन्सेक्स १०४८ अंकांनी घसरुन ८२६२७ अंकांवर बंद झाला. निफ्टीचा विचार केला तर ३३६ अंकांनी घसरुन २५४७१ अंकावर आला.

#### झिम्बॉब्वेकडून ऑस्ट्रेलिया २३ धावांनी पराभूत

**कोलंबो ।** टी-२० वर्ल्ड कपमध्ये आज ऑस्ट्रेलियाला झिम्बॉब्वेविरुद्ध २३ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. टी २० वर्ल्ड कपमध्ये २००७ मध्ये देखील झिम्बॉब्वेनं ऑस्ट्रेलियाला पराभूत केलं होतं. कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियममध्ये झालेल्या मॅचमध्ये झालेल्या पराभवाननंतर कॅप्टन ट्रेविस हेडनं सामन्यात कुठं चुकलं ते सांगितलं आहे. झिम्बॉब्वेनं पहिल्यांदा फलंदाजी करताना २० ओव्हरमध्ये २ बाद १६९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघ १९.३ ओव्हरमध्ये १४६ धावांवर बाद झाला. झिम्बॉब्वेनं ऑस्ट्रेलियाला २३ धावांनी पराभूत करत टी २० वर्ल्ड कपमध्ये मोठा उलटफेर केला.

#### भाजपसोबत १ कोटी मोजायला बसले होते का?

**मुंबई ।** शिवसेना ठाकरे गटाने भाजपला पाठिंबा दिल्याने राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली. आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी चंद्रपूरमधील राजकारणावर प्रतिक्रिया दिली आहे. चंद्रपूरमध्ये जे आमच्या पक्षाने स्थानिक पातळीवर निर्णय घेतला ती आमची भूमिका नाही. त्यांचं आम्ही समर्थन करत नाही. स्थानिक नेत्यांनी त्यांच्या स्वार्थासाठी काही निर्णय घेतले असतील, तर त्यांच्यावर कारवाई होईल, असंही संजय राऊतांनी सांगितले. चंद्रपुरातील ठाकरेंच्या नगरसेवकांनी १ कोटी घेतले असा आरोप करणाऱ्या संदीप देशपांडेंनाही राऊतांनी उत्तर दिलं आहे.

# बांगलादेशात परिवर्तनाची नांदी

## ● बीएनपी ३०० पैकी २०० पार; तारिक रहमान नवे पंतप्रधान

वृत्तसंस्था । ढाका

**बांगलादेशात जुलै २०२४ मधील उठावानंतर बांगलादेशी जनतेने पहिल्यांदाच राष्ट्रीय निवडणुकीत मतदान केले. तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने (बीएनपी) बहुमताचा १५० आकडा पार करताच विजयाची घोषणा केली.**

बांगलादेशमधील सर्वात मोठा इस्लामी पक्ष जमात-ए-इस्लामीला मागे टाकत बीएनपीने (पान २ वर)



**➤ बांगलादेशात रहमान पर्व**

**बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार कोसळल्यानंतर दीड वर्षांनी निवडणूक झाल्या. या निवडणुकांमध्ये बांग्लादेश नेशनलिस्ट पक्षाने मोठा विजय मिळवला आहे. पक्षाला दोन तृतियांश बहुमत मिळाले आहे. तारिक आता फक्त उत्तराधिकारी नसून आता ते सर्वात शक्तिशाली नेते असल्याचे बहुमतातून सिद्ध झाले आहे. ज्यांना १७ वर्षांपूर्वी देश सोडावा लागला त्यांच्याच हाती लोकांनी सत्ता दिली आहे. शेख हसीना यांची सत्ता गेल्यानंतर आणि त्यांच्या आईच्या आजारपणानंतर रहमान पुन्हा राजकारणात सक्रीय झाले. आई खालिदा यांच्या निधनानंतर त्यांना बीएनपीचे प्रमुख बनवण्यात आले. पहिल्याच निवडणुकीत त्यांच्या नेतृत्त्वाखाली पक्षाला बहुमत मिळाले असून रहमान पर्व बांगलादेशात सुरू होणार आहे.**

## चालत्या इलेक्ट्रिक बसला भीषण आग

वृत्तसंस्था । चाकण

पुण्याच्या चाकण औद्योगिक वसाहतीत आज सकाळी एका भीषण घटनेने खळबळ उडाली होती. महिंद्रा कंपनीसमोर प्रवाशांनी भरलेल्या धावत्या इलेक्ट्रिक बसने अचानक पेट घेतला. बसमध्ये साधारण ५० कामगार प्रवास करत होते. सुदैवाने, चालकाने प्रसंगावधान राखत बस थांबवून प्रवाशांना तत्काळ खाली उतरवल्यामुळे मोठी जीवितहानी टळली आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी, असा अंदाज बांधला जात आहे. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचेपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते आणि काही वेळातच लाखो रुपयांची ही बस जागेवर जळून खाक झाली.

# ...तर मी राजीनामा देणार

## मंत्रालयातील लाच प्रकरणानंतर नरहरी झिरवळ यांचं मोठं वक्तव्य

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**लाचलुचपत प्रतिबंध विभागाने गुरुवारी मुंबईत केलेल्या कारवाईने राज्यात खळबळ उडाली आहे. कारण एसीबीच्या कारवाईत गुरुवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास अन्न व औषध प्रशासन विभागाच्या क्लार्कला अटक करण्यात आली. राजेंद्र ढेरंगे असे या क्लार्कचे नाव असून ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना त्याला पकडण्यात आलं.**

मंत्रालयात दुसऱ्या मजल्यावर ही कारवाई करण्यात आली. ज्या खात्यातील क्लार्कवर ही कारवाई करण्यात आली त्या अन्न व औषध प्रशासन



विभागाचे मंत्री हे या घटनेमुळे अडचणीत आले असून आज त्यांनी याप्रकरणी आपली बाजू मांडत लाच घेणाऱ्या क्लार्कवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असं म्हटलं आहे.

तुमच्या मंत्र्यालयातील हा क्लार्क होता, तर ही जबाबदारी तुमच्यावरही येत नाही का? असा प्रश्न आज नवी दिल्ली इथं पत्रकारांकडून मंत्री नरहरी झिरवळ यांना विचारण्यात आला. त्यावर झिरवळ म्हणाले की, ही जबाबदारी आहेच, नाही म्हणून चालणार नाही. त्याने जे कृत्य केलंय, त्याला आम्ही पाठीशी घालणार नाही, हे मी खात्रीने तुम्हाला सांगतो. या प्रकरणाची चौकशी व्हावी. चौकशीत जर या लाच प्रकरणाची लिंक माझ्यापर्यंत जोडली गेली, तर मी मंत्रिपदाचा राजीनामा देईन, (पान २ वर)

# सॅटेलाइट पाहणीत जळगावात ४४ हजार हेक्टरवरील बनावट केळी पीक विमा उघड

## बोगस अर्जदारांवर कठोर कारवाईचे संकेत; जिल्हाधिकाऱ्यांची माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्यासह राज्यात कोट्यावधी रुपयांचा पीक विमा लाटण्याचा प्रकार समोर आला आहे. जळगाव जिल्ह्यात ४४ हजार हेक्टरवर बनावट केळी पीक विमा काढल्याचेही सॅटेलाइट पाहणीत उघड झाले आहे. कृषी आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांना बनावट पीक विमाबाबत प्राथमिक अहवाल केला सादर केला आहे. या अहवालामध्ये जिल्ह्यातील ४४ हजार हेक्टरवरील शेतकऱ्यांच्या पीक विम्याची ३७ कोटी रुपयांची रक्कम जप्त करण्यात आल्याची जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे.**

कृषी आयुक्तांच्या अहवालानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने इन्शुरन्स कंपन्यांचे प्रतिनिधी व कृषी विभागाच्या निगडित सर्व अधिकाऱ्यांची बैठक बोलावली. बैठकीनंतर कृषी आयुक्तांची चर्चा करून कारवाईबाबत दिशा ठरवली जाईल, असं जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी स्पष्ट केलं आहे. जळगाव जिल्ह्यात हवामानावर आधारित फळ पीकविमा योजनेंतर्गत केळी लागवड नसलेल्या क्षेत्रावर पीक



दाखवून मोठ्या प्रमाणात बनावट अर्ज सादर केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार २५ हजारांहून अधिक अर्ज संशयास्पद असून संबंधितांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. सन २०२५-२६ या वर्षात मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल २७,२५९ अर्जांची वाढ नोंदवली गेली. सुमारे २८ हजार हेक्टर क्षेत्र केळी लागवडीखाली असल्याचे दाखवण्यात आले. अचानक झालेल्या या वाढीमुळे कृषी विभागाने उपग्रहाच्या माध्यमातून सखोल तपासणी केली असता चोपडा, मुक्ताईनगर, यावल आणि रावेर तालुक्यांत मोठ्या प्रमाणावर अनियमितता आढळली.

प्रत्यक्षात केळी लागवड नसताना अर्ज करणे, लागवड क्षेत्र जास्त दाखवणे, जिओ-टॅग छायाचित्रांमध्ये फेरफार करणे आणि इतरांच्या कागदपत्रांचा वापर करणे असे प्रकार समोर आले. या प्रकरणात विमा हप्त्याच्या स्वरूपात जमा झालेले सुमारे ३७ कोटी ४३ लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. वेळेत पडताळणी झाल्यामुळे राज्य सरकारचे १२३ कोटी ५३ लाख (पान २ वर)

# भीषण आगीत १८ हजार क्विंटल कापूस जळून खाक

वृत्तसंस्था । नागपूर

**नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यातील कुही आंभोरा मार्गावरील भंडारबोडी परिसरातील कल्पना जिनिंग कारखान्यात गुरुवारी सायंकाळी लागलेल्या भीषण आगीने केवळ आर्थिकच नव्हे तर औद्योगिक सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. सुमारे १८ हजार क्विंटल कापूस जळून खाक झाला असून अंदाजे १२ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.**



या दुर्घटनेत आठ वर्षीय रोहन सुरेश दूधवे हा बालक भाजला असून त्याच्यावर नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगितले आहे.

नियंत्रण कक्षाला आग लागल्याची माहिती मिळताच कुही येथून दोन अग्निशमन गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. मात्र कारखान्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर साठवलेला कापूस आणि इतर ज्वलनशील साहित्यामुळे आगीने काही क्षणांतच विक्राळ रूप धारण केले. त्यानंतर मौदा व उमरेड येथील अग्निशमन पथकेही मदतीसाठी दाखल झाली. रात्री उशिरापर्यंत धुराचे लोट आणि ज्वाळा दूरवरून दिसत होत्या.

## संपादकीय

### पारदर्शकतेच्या दिशेने पाऊल

भूसंपादन ही कोणत्याही राष्ट्राच्या विकास प्रक्रियेतील अत्यंत पायाभूत आणि तितकीच संवेदनशील बाब मानली जाते. रस्ते, रेल्वे, धरणे, औद्योगिक वसाहती आणि नागरी सुविधांच्या उभारणीसाठी जमिनीची आवश्यकता असते आणि ही जमीन बहुतांश वेळा शेतकऱ्यांकडून किंवा खासगी मालकांकडून घेतली जाते. भूसंपादनाचे महत्त्व अनन्यसाधारण असले तरी, त्याभोवती असलेले वादाचे वलय आणि प्रशासकीय गुंतागुंत यामुळे हा विषय नेहमीच चर्चेत राहिला आहे. पुण्यातून समोर आलेल्या ताज्या निर्णयानुसार, आता भूसंपादनाचा अंतिम निवाडा आणि भरपाईची रक्कम जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक झाले आहे. हा निर्णय केवळ प्रशासकीय सुधारणा नसून, तो पारदर्शकतेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भूसंपादनाचा इतिहास पाहिला तर आपल्याला ब्रिटिशकालीन वारशाकडे वळावे लागते. भारतामध्ये दीर्घकाळ १८९४ चा भूसंपादन कायदा अस्तित्वात होता. या कायद्याचा मुख्य उद्देश हा वसाहतवादी शासनाला हव्या असलेल्या प्रकल्पांसाठी सक्तीने जमीन अधिग्रहित करणे हा होता. या जुन्या कायद्यात सार्वजनिक प्रयोजन या संज्ञेची व्याप्ती मोठी होती, परंतु त्या बदल्यात मिळणारी भरपाई आणि विस्थापितांचे पुनर्वसन या बाबींकडे दुर्लक्ष केले गेले होते. स्वातंत्र्यानंतरही अनेक दशके याच कायद्याच्या आधारे काम चालले, ज्यामुळे शेतकरी आणि सरकार यांच्यात मोठे संघर्ष निर्माण झाले. अनेक प्रकल्प हे केवळ भूसंपादनातील कायदेशीर पेच आणि मोबदल्यातील अन्यायामुळे रखडले. जमिनीची बाजारभावाप्रमाणे किंमत न मिळणे, पुनर्वसनाची ठोस हमी नसणे आणि निर्णय प्रक्रियेत जमिनीच्या मालकाचा सहभाग शून्य असणे या जुन्या धोरणातील प्रमुख त्रुटी होत्या. या पार्श्वभूमीवर २०१३ मध्ये केंद्र सरकारने भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित मोबदला मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क कायदा संमत केला. या कायद्याने भूसंपादनाच्या प्रक्रियेत मानवी चेहरा आणण्याचा प्रयत्न केला. जमिनीच्या मोबदल्यात भरघोस वाढ, सामाजिक परिणामांचे मूल्यांकन आणि बाधित लोकांच्या संमतीला महत्त्व अशा तरतुदी यामध्ये करण्यात आल्या. महाराष्ट्रातही या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली, मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना स्थानिक पातळीवर अनेक अडचणी येत होत्या. शेतकऱ्यांना आपल्या जमिनीचा निवाडा किती झाला, त्याला किती पैसे मिळणार आणि त्याच्या जमिनीचा ताबा कधी घेतला जाणार, या माहितीसाठी तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असत. माहिती अधिकार कायद्याचा वापर करूनही अनेकदा ही माहिती वेळेत मिळत नसे. भूसंपादनातील समस्यांचा विचार केल्यास माहितीचा अभाव ही सर्वात मोठी समस्या ठरते. जेव्हा एखादा प्रकल्प जाहीर होतो, तेव्हा दलाल आणि मध्यस्थ सक्रिय होतात. शेतकऱ्याला त्याच्या जमिनीची खरी किंमत माहीत नसल्याचा फायदा हे मध्यस्थ घेतात. याशिवाय, सरकारी दप्तरी होणारा विलंब आणि सातबारा उताऱ्यावर वेळेत नोंदी न होणे यामुळे कायदेशीर गुंतागुंत वाढते. अनेकदा भूसंपादन होऊनही कागदोपत्री मालकी बदलत नाही, त्यामुळे नंतरच्या काळात जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार होऊन फसवणुकीचे प्रकार घडतात. इतर राज्यांच्या धोरणांचा विचार केल्यास, हरियाणा आणि तेलंगणा सारख्या राज्यांनी भूसंपादनासाठी ऑनलाइन पोर्टल विकसित केली आहेत. तिथे जमिनीच्या मालकांना थेट त्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचा संदेश मिळतो आणि सर्व कागदपत्रे सार्वजनिक उपलब्ध असतात. महाराष्ट्राने आता याच धर्तीवर पाऊल उचलले असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर सर्व निवाडे प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे.

# जिल्ह्यातील विकासकामांसाठी १९० कोटींचा वाढीव निधी द्या!

## पालकमंत्री जयकुमार रावल यांची मागणी

प्रतिनिधी । धुळे




**जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत विविध विकास कामांसाठी १९० कोटी रुपयांच्या वाढीव निधीची मागणी राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या राज्यस्तरीय बैठकीत केली.**

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२६-२७ चा धुळे जिल्ह्याचा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठीची राज्यस्तरीय बैठक मुख्यमंत्री आणि वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे पार पडली. बैठकीला राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, प्रधान सचिव, कृषी तथा धुळे पालक सचिव तसेच धुळे जिल्हाधिकारी कार्यालयातून आ.मंजुळा गावित, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, कृष्णा मोहन, जिल्हा नियोजन अधिकारी संतोष वानखेडे यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री रावल म्हणाले की, जिल्ह्यात पाच नगरपालिका व एक महापालिका आहे. त्यांच्या पायाभूत विकासकामांसाठी मोठ्याप्रमाणात निधीची आवश्यकता आहे. जिल्ह्यात चार तालुके असून दोन तालुके हे आदिवासी क्षेत्रातील असल्याने आदिवासी पायाभूत विकास कामांसाठी व भागातील सिंचन सुविधा, विविध विकास कामे, नवीन ग्रामपंचायतींची बांधकामे, स्मशानभूमी, दफनभूमी, भूजल पातळी वाढविण्यासाठी, नवीन दुरुस्ती, नवीन प्राथमिक शाळा इमारत, नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र, पाणीपुरवठा योजना, नवीन रस्ते, विकास अशा विविध विकासकामांसाठी धुळे जिल्ह्यास भरीव वाढीव निधीची मागणी त्यांनी यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली.

## अडावद येथील जवानाचा सत्कार



प्रतिनिधी । अडावद

**येथील सीआयएसएफ जवान प्रशांत सुनील पाटील यांनी आपल्या ११ महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण करून प्रथमच गावी आल्याने त्यांचे गावकऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आला.**

प्रशांत हा लहानपणापासूनच एक ध्येय वेडा होता. भारत मातेची सेवा हाच त्याचा ध्यास आणि लक्ष होते. त्यासाठी त्याने अनेक कसोट्या पार करत आपल्या गरीब परिस्थितीची जाणीव ठेवून त्याने आपले शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर आपल्या ११ महिन्याचे प्रशिक्षण करून प्रथमच गावी आला. त्याचे उत्साहात स्वागत करण्यात आले. जेष्ठ पत्रकार पी.आर.माळी, जितेंद्रकुमार शिंपी, विलास पाटील, महेश गायकवाड, रफिक मन्यार, गोपाल सुतार तचेच गावातील वरिष्ठ मंडळी अशोक पाटील, नंदलाल पाटील, दिगेश सुतार, कैलास गुरव, समादान कोळी, महेश बिरारी, गणेश पाटील, धीरज पाटील, लेतेश पाटील, स्वप्नील बाहेती यांनी जवानाचे स्वागत शाल, श्रीफळ देऊन केले. जवान प्रशांत पाटील हे भारतीय पत्रकार संघटनेचे उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष विलास पाटील यांचे पुतणे आहेत.

## रेल्वे प्रकोष्ठ जिल्हाध्यक्षपदी कमलेश तिवारी यांची नियुक्ती

प्रतिनिधी । धरणगाव



भारतीय जनता पार्टीतर्फे संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून पक्षाचे ज्येष्ठ नेते कमलेश विश्वनाथ तिवारी यांची रेल्वे प्रकोष्ठच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती जाहीर केली. ही नियुक्ती भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून संघटन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती करण्यात आली आहे. पक्ष संघटनाला गती देणे, विविध घटकांशी प्रभावी समन्वय साधणे आणि स्थानिक पातळीवर पक्षाची उपस्थिती अधिक दृढ करणे हा या नियुक्त्यांचा प्रमुख हेतू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. रेल्वे प्रकोष्ठ ही पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील महत्त्वाची जबाबदारी मानली जात असून, रेल्वेसंदर्भातील प्रश्न, प्रवाशांच्या समस्या आणि स्थानिक विकासाशी निगडित मुद्यांवर काम करण्यासाठी या पदाची भूमिका निर्णायक ठरते. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष कमलेश तिवारी यांनी नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हणाले की, पक्षाने दिलेली जबाबदारी अधिक वाढली आहे. संघटन बळकटीवर भर देत रेल्वेसंदर्भातील स्थानिक समस्या प्राधान्याने मांडल्या जातील. सदस्य नोंदणी अभियान, जनसंपर्क मोहीम तसेच विविध समाजघटकांशी सातत्यपूर्ण संवाद वाढविण्यावर विशेष लक्ष दिले जाईल. पक्षाचे कार्यक्रम स्थानिक पातळीवर अधिक प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न राहील, असे तिवारी यांनी स्पष्ट केले. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष कमलेश तिवारी यांच्या नियुक्तीचे धरणगाव तालुका परिसरात स्वागत करण्यात आले.

## श्री नर्मदेश्वर महादेव मंदिराचा उद्या प्राणप्रतिष्ठा सोहळा

प्रतिनिधी । धरणगाव



महाशिवरात्रीच्या पावन पर्वाचे औचित्य साधत हिंगोणे शिवारातील लिटल ब्लॉसम स्कूलजवळ श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे भव्य आयोजन रविवारी करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन लक्ष्मीबाई अर्जुन पाटील, कमलबाई अर्जुन पाटील यांच्यावतीने करण्यात आले आहे. धार्मिक श्रद्धा, भक्तीभाव आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश देणारा हा सोहळा रविवार, (दि.१५) रोजी आयोजित करण्यात आला असून सकाळी ९ ते सायं. ५ या वेळेत विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. यानिमित्ताने सर्व भाविक भक्तांसाठी तीर्थप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील तसेच बाहेरील भाविकांनी उपस्थित राहून दर्शन व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## महात्मा फुले हायस्कूलच्या इ. १० वी.च्या विद्यार्थ्यांना भावनिक निरोप

### ● चित्रकला इंटरमिजिएट गुणपत्रिका वितरण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी । धरणगाव




**शहरातील सुवर्ण महोत्सवी परंपरा जपणाऱ्या महात्मा फुले हायस्कूल येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली.**

समारंभाचे प्रास्ताविक दहावीचे वर्गशिक्षक एस.व्ही. आढावे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक जे.एस.पवार होते. यावेळी शासकीय चित्रकला परीक्षा इंटरमिजिएटच्या गुणपत्रिकांचे विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. उपशिक्षक एच.डी.माळी, पी.डी.पाटील आणि एस.व्ही. आढावे यांनी एस.एस.सी. बोर्ड परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, लेखनशैली तसेच परीक्षेतील आत्मविश्वास टिकवण्याबाबत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.

समारंभात विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत भावनिक मनोगत व्यक्त केली. शितल भोई, वैभव माळी, भावना चंडाले, उमेश महाजन आणि यश जाधव यांनी शिक्षकांचे मार्गदर्शन, मैत्रीचे बंध आणि शाळेतील अनुभव यांचा उल्लेख करत कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी दहावीच्या विद्यार्थ्यांच्या बॅचकडून शाळेला मोठे बॅनर भेट देण्यात आले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक जे.एस.पवार यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत परिश्रम, शिस्त आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले. सूत्रसंचलन पी.डी.पाटील यांनी केले, तर आभार एस.एन. कोळी यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## ८० वर्षांनंतर भारताची पॉवर सिस्टम बदलली

वृत्तसंस्था । दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सेवा तीर्थ इमारत संकुलाचे उद्घाटन केले. पंतप्रधान कार्यालय (पीएमओ), राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय (एनएससीएस) आणि कॅबिनेट सचिवालय आता या संकुलात स्थलांतरित करण्यात आले आहे.**

सरकारने साउथ ब्लॉकचे सेवा तीर्थ, केंद्रीय सचिवालयाचे कर्तव्य भवन, राजपथचे कर्तव्य पथ, रेसकोर्स रोडचे लोक कल्याण मार्ग आणि राजभवन, राज निवास यांचे लोकभवन, लोक निवास असे नामकरण केले आहे. दशकांपासून, अनेक महत्त्वाची केंद्र सरकारी कार्यालये आणि मंत्रालये सेंट्रल व्हिस्टा परिसरातील विविध ठिकाणी असलेल्या जीर्ण इमारतींमधून कार्यरत आहेत. यामुळे तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पुरेसे कामाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवाय, कर्मचाऱ्यांमध्ये समन्वयाचा अभाव आणि देखभाल खर्चाशी संबंधित अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. नवीन कॅम्पसमध्ये या समस्यांचे निराकरण केले आहे आणि भविष्यातील गरजांनुसार तयार केलेल्या सुविधांचा समावेश केला आहे.

## अस्तित्व फाउंडेशनतर्फे क्षयरुग्णांना पोषण आहार वाटप

प्रतिनिधी । शिरपूर

**शिरपूर तालुका क्षयरोगमुक्त होण्यासाठी अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशनच्या डायरेक्टर कृतिबेन भूपेशभाई पटेल यांच्याहस्ते खर्दे बु. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. स्व. तपनभाई मुकेशभाई पटेल यांच्या स्मरणार्थ द्रेता करण पटेल नथवाणी यांच्या संकल्पनेतून अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.**

भारत सरकारच्या प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियान आणि स्वस्थ नारी सशक्त नारी, सशक्त परिवार उपक्रमांतर्गत क्षयरुग्णांना मोफत पोषण आहार किटचे वितरण करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनने शिरपूर तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत उपचार घेत असलेल्या क्षयरुग्णांना पोषण आहार किट वाटपचा नियमित टप्पा पूर्ण केला.

या पोषण किटमध्ये सोयाबीन तेल, शेंगदाणे, मुगदाळ, तांदूळ, सोयाबीन वडी, गहू पीठ, हरभरा, गूळ आणि प्रोटीन पावडर यांसारख्या पोषणासाठी उपयुक्त पदार्थांचा समावेश आहे. अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनचा हा उपक्रम टीबी रुग्णांच्या आरोग्य सुधारात महत्त्वाची भूमिका बजावत असून, भविष्यातही अशी सामाजिक बांधिलकी कायम ठेवण्याचे संस्थेने सांगितले. कार्यक्रमासाठी फाऊंडेशनच्या संचालिका कृतिबेन भूपेशभाई पटेल, समन्वयक सोनिया भसिन, रोहिणी येथील प्रा.आ. केंद्राचे डॉ.राष्ट्रपाल अहिरे, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी, खर्दे बु.चे प्रा.आ. केंद्राचे डॉ. मंगेश निकम, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक धनराज पवार, डॉ.अश्विनी पाटील तसेच प्रा.आ. केंद्राचे कर्मचारी व अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनची टीम उपस्थित होती.

## खांडबारा येथे नवापूर ते देवमोगरा माता पदयात्रेकरूंचे उत्साहात स्वागत

प्रतिनिधी । नवापूर

**येथून देवमोगरा माता दर्शनासाठी निघालेल्या पदयात्रेकरूंचे खांडबारा ग्रामस्थांतर्फे उत्साहात आणि भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. गावात प्रवेश करताच पदयात्रेकरूंवर फुलांचा वर्षाव करून त्यांचे स्वागत करण्यात आले.**

यावेळी ग्रामस्थांनी पदयात्रेकरूंसाठी चहा व नाश्त्याची विशेष व्यवस्था केली होती. दीर्घ पायी प्रवासामुळे थकलेल्या भाविकांना या सेवेमुळे मोठा दिलासा मिळाला. ग्रामस्थांनी प्रेमाने व आपुलकीने सेवा करत अतिथी देवो भव ही परंपरा जपली. देवमोगरा मातेसाठी चाललेल्या या पदयात्रेत महिला, पुरुष तसेच युवकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. देवमोगरा माता की जय च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला. यावेळी माजी सरपंच अविनाश गावित, सामाजिक कार्यकर्ते गणेश पाडवी, अशोक वाडिले, कैलास शर्मा, विकी अग्रवाल, नरेश चौधरी, आर्यन पाडवी, आकाश झंजारे, लखन पवार, संकेत अहिरे, राहुल सोनार व गावातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

### सॅटेलाइट पाहणीत......

आणि केंद्र सरकारचे ९३ कोटी ५८ लाख, असे एकूण सुमारे २१७ कोटी रुपयांचे संभाव्य नुकसान टळल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. संबंधित बोगस अर्जदारांवर कठोर कारवाईचे संकेत कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास रस्तोगी यांनी दिले आहेत.

### बांगलादेशात परिवर्तनाची ......

परिवर्तनाची नांदी केली. बीएनपीला ३०० पैकी २०१ जागा मिळाल्याची माहिती असून, जमातच्या वाट्याला ७२ जागा येण्याचा अंदाज आहे. शेख हसीनाच्या नेतृत्वाखालील अवामी लीग सरकार कोसळल्यानंतर मुहम्मद युनूस यांनी सत्ता हाती घेतली. युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारचे सत्तापालट करत बीएनपीने कट्टर भारतविरोधी जमात आणि त्याच्या मित्रपक्षांवर मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच अजिंक्य आघाडी घेतली होती.

बांगलादेशात १३ व्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवारी मतदान पार पडले. तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आल्यानंतर दीड वर्षांनी ही निवडणूक झाली. संसदेच्या तीनशे जागांपैकी २९९ जागांवर हे मतदान झाले. एका मतदारसंघातील उमेदवाराच्या निधनामुळे तेथे मतदान घेण्यात आले नाही. बांगलादेशाच्या स्थानिक प्रमाणवेळेनुसार सकाळी साडेसात ते दुपारी साडेचार या कालावधीत मतदान आटोपल्यानंतर लगेचच मतमोजणीस सुरुवात झाली. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीला (बीएनपी) या निवडणुकीत जनमताचा कौल मिळेल, असा अंदाज निवडणूकपूर्व सर्वेक्षणात वर्तवण्यात आला होता. या मतदानादरम्यान अनेक ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या. मात्र, कोठेही मतदान स्थगित करण्यात आले नाही. तसेच, धोक्याचा इशारा देण्यासारखी परिस्थिती कोठेही आढळली नाही, अशी माहिती बांगलादेश निवडणूक आयोगाचे वरिष्ठ सचिव अख्तर अहमद यांनी दिली.

### ...तर मी राजीनामा ......

असं झिरवळ यांनी स्पष्ट केलं आहे. जो गैरप्रकार झालाय, त्याला आपण कसल्याही प्रकारे पाठीशी घालणार नाही. जी शासकीय किंवा कायदेशीर बाब असेल त्याचा त्याला जाब द्यावा लागेल. कारकून म्हणून त्याचं कार्यालय बाहेर होतं. मंत्री किंवा मंत्र्यांचे खासगी सचिव आणि विशेष कार्य अधिकारी यांच्याशी त्याच्या तसा थेट संबंध नाही. माझं कार्यालय सील केल्याची माहिती मला तुमच्याकडूनच मिळत आहे. पण मला असं वाटत नाही की मंत्रालयातील माझं कार्यालय सील केलं गेलं असावं. मी आज दिल्लीवरून मुंबईला जाणार आहे. मुंबईत गेल्यानंतर मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेईन आणि या सर्व प्रकरणाविषयी त्यांच्यासोबत चर्चा करेन,असं म्हणत यांनी लाच प्रकरणात आपली भूमिका मांडली आहे.

## विद्यार्थ्यांनी परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे!

### ● मुख्याध्यापक राजेंद्र मगरे यांचे आवाहन; १० वीच्या विद्यार्थ्यांना दिला निरोप

प्रतिनिधी । तळोदा



**विद्यार्थ्यांनी परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे. भविष्यात चांगली संगत धरावी व उच्च शिक्षण घ्यावे, असे आवाहन मुख्याध्यापक राजेंद्र मगरे यांनी केले.**

तालुक्यातील मोड येथील कॉ. बी.टी.आर. हायस्कूलमधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप नुकताच पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा तापीबाई माळी होत्या. यावेळी शिक्षक फुंदीलाल राहुल चौधरी, माळी, गीतांजली मराठे, चंद्रकला मराठे, पुष्पांजली वसावे, छाया वळवी आदी उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरुन बोलतांना तापीबाई माळी यांनी, विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने, कष्टाने व प्रामाणिकपणे यश मिळवून आपले व आपल्या शाळेचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. त्यानंतर याप्रसंगी अमृता पाटील, दिव्या भोई, रुपाली पाडवी, मोहिनी शिंदे, प्रेम भिलावे, गणेश राजपूत आदी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करुन शालेय जीवनात आलेल्या अनुभवांचे कथन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या फोटो फ्रेम शाळेला भेट दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुनील लाडे यांनी मानले.

## रांझणी आश्रमशाळेत मातृ-पितृ पूजन

प्रतिनिधी । तळोदा

तालुक्यातील रांझणी येथील विद्यावर्धिनी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत कै. नानासाहेब जगन्नाथ त्र्यंबक वाणी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ मातृ-पितृ पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात आई-वडीलांचे पूजन करुन पालकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव गुलाबराव चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे मानद सचिव सी.एम.पाटील उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक भाऊसाहेब कुवर, माध्यमिक मुख्याध्यापक शालिग्राम वाणी यांनी मनोगत व्यक्त केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# भाजप नगरसेवकांचे बाहेर भ्रष्टाचाराचे आरोप; सर्वसाधारण सभेत मात्र साधली चुप्पी!

## ● नागेश्वर येथे नमो उद्यानाला विरोध; २ तासांत ७६ विषयांना मंजुरी





प्रतिनिधी । वरणगाव

**वरणगाव नगरपरिषदेची पहिलीच नवनिर्वाचित नगरसेवकांची सभा शुक्रवारी झाली. गेल्या काही दिवसांपासून भोगावती नदी भ्रष्टाचार बांधकामप्रकरणी भाजपाच्या नगरसेवकांनी नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देवून भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्या अनुषंगाने पहिल्याच सर्वसाधारण सभेत भाजप नगरसेवकांकडून अपक्ष नगराध्यक्ष सुनिल काळे यांना सर्वसाधारण सभेत भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली घेरणार असे एकंदरीत वाटत होते. परंतु आज झालेल्या सर्वसाधारण सभेत भाजप नगरसेवकांनी भ्रष्टाचारप्रकरणी एक शब्दही न काढता चुप्पी साधली. यामुळे सभागृहात भाजप नगरसेवकांचे नगराध्यक्ष सुनिल काळेंना हम साथ साथ है, असे ठोसपणे भाजप गटनेत्या दीपाली माळी यांनी जाहीर केले.**

सुरुवातीला सभा सुरु होण्यापूर्वी स्व. अजितदादा पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर ११.३० मिनिटात पहिल्या विषयाच्या वाचनाला सुरुवात झाली. या सर्वसाधारण सभेत अजेंड्यावर एकूण ७९ विषय होते. यापैकी साधक-बाधक चर्चा होऊन ७६ विषयांना मंजुरी दिली. व शहराच्या विकासासाठी आम्ही एकत्र आहोत, असा संदेश सर्वच नगरसेवकांनी यावेळी त्यांच्या बोलण्यातून दिला. शहरामध्ये नगराध्यक्ष अपक्ष, १४ भाजप नगरसेवक, पाच शिवसेना आणि दोन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नगरसेवक आहेत. या ठिकाणी नगराध्यक्ष अपक्ष असल्याने वादळी सभा होईल, असा अंदाज वर्तवला जात होता. त्यानुसार सभेपूर्वीच भाजपच्या कार्यकर्त्यांनी नगराध्यक्षांवरती भोगावती नदी सुशोभीकरणांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे आरोप केले होते. मात्र, या विषयावरती या ठिकाणी सभागृहात कोणीच बोलले नाही. तसेच विविध विषयावरती साधक-बाधक चर्चा करत या सभेतील ७९ पैकी ७६ विषयांना मंजुरी देण्यात आली.

यावेळी उपनगराध्यक्ष अरुणा इंगळे, मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे, उपमुख्याधिकारी रशीद नौरंगाबादि पाणीपुरवठा विभागाचे ज्ञानेश्वर पवार, आरोग्य विभागाचे दीपक काळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मनिष चव्हाण, रविंद्र गायकवाड, राजुसिंग चव्हण, भाजपा गटनेता दीपाली माळी, शामल झांबरे, श्रध्दा गायकवाड, वृषाली चौधरी, भाग्यश्री सोनवणे, दिपेश पाटील, रविंद्र सोनवणे, मनिषा माळी, सीमा धनगर, शुभम जावळे, वंदना पाटील, निलेश खाचणे, सौ. हळदे, सौ. मिर्झा, शिवसेना गटनेत्या तृप्ता महाजन, माला मेढे, राजेंद्र चौधरी, विनोद झोपे, शबाना खाटीक, अशपाक शाह, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटनेता इरफान अली, निलेश चौधरी, राजेंद्र गायकवाड, संजय माळी व सर्व नगरसेवक उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन संतोष भोई यांनी केले. वरणगाव नगरपरिषदेतील भारतीय जनता पार्टीच्या सर्व १५ नगरसेवकांनी नमो उदयान हे नागेश्वर महादेव मंदीर परीसरात न करता दुसऱ्या जागेवर गावात करण्यात यावे, असे संदर्भातील निवेदन मुख्याधिकारी रविंद्र सोनवणे यांना देण्यात आले.

**सभेची सांगता वंदे मातरमने करावी :- राजेंद्र चौधरी**

सर्वसाधारण सभेची सुरुवात जन गण मन या राष्ट्रगीताने झाली आणि सभा सांगता ही वंदे मातरमने घ्यायला पाहिजे होती. परंतु तसे न करता सुरुवातही जन गण मन ने ही आणि सांगता ही राष्ट्रगीताने झाल्याने शिवसेनेच्यावतीने आम्ही या संदर्भात आक्षेप नोंदवतो आणि यापुढील सभा राष्ट्रगीताने सुरुवात करावी व सांगता वंदे मातरतने करावी, असे आम्ही सर्व शिवसेनेचे नगरसेवक सभागृहाच्या पिठासन अधिकारी नगराध्यक्ष यांच्याकडे केली.

### ● विरोधी पक्षनेतेपदी निलेश चौधरी

सभागृहामध्ये विरोधी पक्षनेते म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे निलेश उर्फ नाना चौधरी यांची निवड करावी, असा अर्ज आयत्या वेळी विषय समोर आला. त्यावेळी सभागृहात विरोधी पक्षनेतेपदी निलेश चौधरी यांची निवड करण्यात आली. या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष सुनील काळे यांनी काम पाहिले.

### ➤ भूखंड साफसफाईसह तीन विषय नामंजूर

**नागेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट येथे उभारण्यात येणाऱ्या नमो उद्यान प्रस्तावित जागेवर न करता शहरात इतरत्र करावे, अशी मागणी करीत या विषयाला विरोध करण्यात आला. तसेच बांधकाम विभागामार्फत होणारी कामे नगरपालिकेमार्फत करण्याबाबतचे ठराव, एलईडी दुरुस्ती व देखभालसाठी ठेकेदाराला देऊ नये, शहरातील ओपन स्पेस, भूखंड साफसफाई बाबतचा निर्णय घेणे या तीन ठरावांना भाजपाच्या १४ नगरसेवकांनी पत्र देऊन नामंजूर केले.**

## भुसावळ तालुक्यात अवैध दारू विक्रीचा प्रकोप

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील सावतर, निंभोरा, हतनूर, तापी किनारा, साकेगाव आणि इतर ग्रामीण भागांमध्ये अवैध दारू विक्री व गावठी दारू भट्ट्यांचा प्रसार दिवसेंदिवस वाढत असून, स्थानिक नागरिकांचा संताप उफाळला आहे.**

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पन्नी दारू आणि रिकाम्या बाटल्यांमध्ये विषारी गावठी दारू भरून विक्री केली जात आहे. यामुळे कठोरा गावात काही दिवसांत २ ते ३ जणांचा मृत्यू झाला असून, शाळकरी मुलांपासून वयोवृद्ध नागरिकांपर्यंत अनेक जण या व्यसनाच्या विळख्यात अडकले आहेत. या अवैध धंद्यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. घराघरांत संघर्ष निर्माण झाला आहे आणि आर्थिक संकट वाढले आहे. स्थानिकांचे म्हणणे आहे की, दारूमुळे समाजात नैतिक आणि सामाजिक मूल्ये ढासळत आहेत. तसेच घरात हिंसा आणि असुरक्षितता वाढली आहे. सर्वसामान्य नागरिक आता विचार करतात की, जीवितहानी होऊनही प्रशासन गप्प का आहे? नागरिकांनी तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच जिल्हा पोलीस अधिक्षकांनी या प्रकरणाकडे गंभीर लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## थोडक्यात

### धानोरा विद्यालयात विद्यार्थ्यांना निरोप

**धानोरा ता.चोपडा ।** येथील झि.तो. महाजन माध्यमिक व ना.भा. पाटील ज्युनिअर कॉलेजात इयत्ता १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे माजी शालेय समिती सदस्य बाजीराव पाटील होते. प्रमुख पाहुणे शालेय समिती ज्येष्ठ सदस्य वामनराव महाजन, योगेश पाटील, सागर चौधरी, जगदीशकुमार पाटील, प्राचार्य के.एन.जमादार, ज्येष्ठ शिक्षक एस.पी.महाजन, पर्यवेक्षक एल.डी. पाटील, पालक मच्छिंद्र साळुंखे, डॉ. पन्नालाल महाजन यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## चोपड्यात साकारले १८ फूट उंच कच्च्या केळ्यांपासून महाशिवलिंग

प्रतिनिधी । चोपडा

**महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि श्रद्धेचा उत्सव मानला जातो. सृष्टीचे रचयिता, सर्व आत्म्यांचे परमपिता, निराकार परमात्मा शिव यांच्या अवतरणाचा हा स्मरणदिन असल्याची आध्यात्मिक मान्यता आहे. त्यानिमित्त प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय, चोपडा यांच्यावतीने प्रथमच १८ फूट उंच व २१,१११ कच्च्या केळ्यांपासून साकारलेले भव्य महाशिवलिंग दर्शनासाठी सजविण्यात आले आहे.**



अज्ञानातून ज्ञानाकडे, अंधःकारातून प्रकाशाकडे आणि अशांततेतून शांततेकडे नेणारा हा पर्व मानवी जीवनात आत्मचिंतन, संयम, पवित्रता आणि सद्भावना जागृत करणारा आहे. उपवास, जप, तप, ध्यान आणि रुद्राभिषेक यांसारख्या धार्मिक कृतींबरोबरच आत्मशुद्धी व सद्गुणांचा स्वीकार करण्याचा संदेशही या दिवशी दिला जातो. यापर्वानिमित्त प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय, चोपडातर्फे हा आध्यात्मिक उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रथमच १८ फूट उंच व २१,१११ ( एकवीस हजार एकशे अकरा ) कच्च्या केळ्यांपासून साकारलेले भव्य महाशिवलिंग दर्शनासाठी सजविण्यात आले असून, हा उपक्रम विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. पर्यावरणपूरक आणि सर्जनशील पद्धतीने साकारलेले हे महाशिवलिंग भक्तांच्या श्रद्धेला नवचैतन्य देणारे ठरत आहे.

## विद्यार्थ्यांनी संविधानाचे दूत बनून सामाजिक जनजागृती करावी

### ● दोनगाव येथे आयोजित विशेष हिवाळी शिबिरात प्रा. विजय घोरपडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । धरणगाव

**आजचा युवक केवळ उच्च शिक्षण प्राप्त करून थांबणारा नसून त्या शिक्षणाचा उपयोग सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून जनजागृतीसाठी करणारा असला पाहिजे. भारतीय संविधानात अंतर्भूत असलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संविधानिक मूल्यांचे आत्मसात करून त्यांचा प्रचार-प्रसार समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांनी संविधानाचे ब्रँड ॲम्बेसिडर किंवा दूत म्हणून कार्य केले पाहिजे. तरच घर घर संविधान ही संकल्पना वास्तवात उतरू शकते, असे प्रतिपादन विचारवंत प्रा. विजय घोरपडे यांनी केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विभाग व सामाजिक शास्त्रे प्रशाळेच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने धरणगाव तालुक्यातील दोनगाव येथे आयोजित विशेष हिवाळी निवासी शिबिरात आजचा युवक आणि संविधानिक मूल्ये या विषयावर प्रा. घोरपडे हे प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज इंगोले व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कविता पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. घोरपडे पुढे म्हणाले की, संविधान हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून राष्ट्रजीवनाचे नैतिक अधिष्ठान असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी लोकशाही मूल्यांप्रती जागरूक राहून सामाजिक समतेच्या चळवळींमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगीत विभागातील प्रा डॉ. सागर चक्रनारायण यांनी विपशना मानवी मनाच्या नियंत्रणाचे उत्तम साधन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबिरास मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

## चोपडा स्वच्छता विभागातील ६५ तर २०४ तक्रारींचा निपटारा

### नगराध्यक्षा नम्रता पाटील, मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या संकल्पनेतून सुटला तिढा

प्रतिनिधी । चोपडा

**नगरपालिकेमार्फत नगरवासीयांना दिवाबत्ती व स्वच्छतेविषयी ताबडतोब सेवा मिळावी या मुख्य उद्देशासाठी व्हाट्सअॅप नंबरची नाविन्यपूर्ण सुविधा नगराध्यक्ष नम्रता पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली नुकतीच उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यास जनतेचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून शहरभर समाधानाची लहर उठली आहे. या भन्नाट सेवेमुळे स्वच्छता विभागाकडील एकूण १०५ प्राप्त तक्रारींतून ६५ तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे, तर विद्युत विभागाकडील प्राप्त २४४ तक्रारीपैकी २०४ तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. चट मंगनी पट विवाह या हिंदी उक्तीप्रमाणे नागरी समस्यांचा निपटारा होत असल्याने नगरवाशिय जाम खुश झाले आहेत.**






“स्वच्छता विभाग व विद्युत विभागामार्फत २४ तासाच्या आत तक्रारीचे निवारण करण्यात येत आहे. परंतु प्रलंबित तक्रारी काही कारणास्तव प्रलंबित आहेत. तसेच नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निराकरण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी दिली आहे. तक्रार निवारण तात्काळ होत असल्यामुळे नागरिक देखील समाधान व्यक्त करीत आहे.”

### ➤ नागरिकांच्या बोलक्या प्रतिक्रिया

**नमस्कार, आपल्या चोपडा नगरपालिकेच्यावतीने शहरातील स्वच्छता आणि दिवाबत्ती बाबतच्या अडचणीसाठी व्हाट्सअॅपवरून तक्रार निवारण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रथमतः या अभिनव उपक्रमाबद्दल आपले अभिनंदन आणि धन्यवाद. या सुविधेचा आम्ही प्रत्यक्ष अनुभव घेतला. आम्ही केलेल्या तक्रारीनंतर २४ तासाच्या आत नगरपालिका कर्मचाऱ्यांनी गटारींचा गाळ उचलून नेला व कॉलनी परिसर स्वच्छ करून दिला. याबद्दल आमच्या स्व. शरदचंद्रिका आक्का कॉलनीच्यावतीने आपले मनःपूर्वक धन्यवाद.**

**जनरल तक्रारी १९५ असून १६४ तक्रारी निकाली काढल्या. ३१ तक्रारी प्रलंबित आहेत. तरी स्वच्छता विभाग तक्रारीसाठी मोबाईल क्रमांक (७८२१९८९५३३) व विद्युत (दिवाबत्ती) विभाग तक्रारीसाठी मोबाईल क्रमांक (९५२९२९६९२१) यावर तक्रार करावी, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनामार्फत करण्यात आले आहे .**

चोपडा नगरपरिषद शहरातील नागरिकांना नियमितपणे विविध नागरी सुविधा तत्परतेने पुरविण्याचे काम करीत आहे. यामध्ये स्वच्छता, विद्युत विभाग (स्ट्रीट लाईट) विभागाशी संबंधित नागरिकांच्या तक्रारी विविध माध्यमांतून



नगरपरिषदेस प्राप्त होत असतात. मात्र, अनेक वेळा नागरिकांना नगरपरिषदेच्या कोणत्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याशी, तसेच कोणत्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, याबाबत संभ्रम निर्माण होत असतो. त्यामुळे तक्रारींच्या निवारणास विलंब होत होता.

परिणामी नागरिकांची हेळसांड होत असल्याचे निदर्शनास आल्याने नगराध्यक्षा नम्रता पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या संकल्पनेतून स्वच्छता विभाग व विद्युत विभागासाठी स्वतंत्र भ्रमणध्वनी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

तक्रार निवारणासाठी स्वतंत्र व्हॉट्सअॅप क्रमांक निश्चित केला आहे. या माध्यमातून आता नागरिकांना घरबसल्या तक्रारी करता येत आहेत. व्हॉट्सअॅप संदेशाद्वारे आतापर्यंत स्वच्छता विभाग व विद्युत विभागाकडील विविध तक्रारी प्राप्त झाल्या. त्यात स्वच्छता विभागात प्राप्त तक्रारींचा गोषवारा असा की, व्हॉट्सअॅप तक्रारी ५२, तर ३१ तक्रारी निकाली काढण्यात आल्या. आता प्रलंबित २१ तक्रारी शिल्लक राहिल्या आहेत. रजिस्टर तक्रारीं ५३ आलेल्या असून ३४ निकाली काढल्या. तर १९ प्रलंबित आहेत.

विद्युत विभागात व्हॉट्सअॅपवरून ४९ तक्रारी प्राप्त झाल्या असून ४० तक्रारी निकाली काढण्यात आल्या. ९ तक्रारी प्रलंबित आहेत.

## चोपडा येथे मोफत आरोग्य शिबिरात १०० रुग्णांची तपासणी

### ● समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जळगाव येथील गोदावरी फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम



प्रतिनिधी । चोपडा

**येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा व जळगाव येथील गोदावरी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन मिलिंद वस्तीगृह पंचशीलनगर चोपडा येथे करण्यात आले होते. यात १०० च्या वर रुग्णांची विविध तपासणी करण्यात आली.**

या शिबिराचे उद्घाटन चोपडा येथे गोदावरी फाउंडेशनचे डॉ.जिझान, जनसंपर्क अधिकारी विजय राजपूत तसेच त्यांच्या टीम हस्ते करण्यात आले.

या आरोग्य तपासणी शिबिरात डॉक्टरांच्या तज्ज्ञ पथकाने नागरिकांची वेगवेगळ्या आजारावर तपासणी केली. यामध्ये डॉ.जिझान, डॉ. राजसुरत लोखंडे, डॉ. सुशांत जाधव, डॉ. चिंतन चौधरी, डॉ. अंशिका प्रसाद, डॉ.शिवानी रसाळ, डॉ. गौरी धाडे, समन्वयक विजय राजपूत, डॉ.लक्ष्मण पाटील, गोदावरी फाउंडेशनच्या नर्सिंग स्टाफ यांनी टुडी इको, ईसीजी, नेत्रतपासणी, हर्निया, शुगर, बीपी इ. रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच समाजकार्य महाविद्यालय चोपडाचे प्राचार्य. डॉ. ईश्वर सौंदाणकर, प्रा.आशिष गुजराथी व प्रा.विनोद रायपुरे व शिक्षक वृंद, स्टाफ व एम.एस.डब्ल्यू द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी पाटील व रीना जाधव यांनी केले. एम.एस.डब्ल्यू द्वितीय वर्षाच्या क्षेत्र कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिबिराचे आयोजन करून सक्रिय सहभाग घेतला. या शिबिराला एकूण १०० च्या वर रुग्णांची तपासणी करण्यात आली. तसेच काही रुग्णांना जळगाव येथे उपचारार्थ पाठविण्यात येईल, असे डॉक्टरांच्या तज्ज्ञ पथकाने सांगितले. शिबीर यशस्वीतेसाठी मिलिंद वस्तीगृहाचे दीपक महाजन व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.